**प्रेसनोट दिनांक २२/६/२०१९**

**<u>उत्तमनगर पोलीस ठाणे पुणे शहर</u>**

**<u>गाडी चोरी करणा-या अल्पवयीन मुलास ताब्यात घेतले बाबत.</u>**

दिनांक २१/६/२०१९ रोजी उत्तमनगर पोलीस ठाण्यातील तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री.के.के.कांबळे तसेच पो. ना. ६६७३ के. बी. पाटील पो शि ८५९२ व्ही. बी. त्रिंबके, पो शि ८१५९ आर. आर. ताकवणे तसेच मार्शलचे कर्मचारी पो. हवा. १९३४ एन. बी. मोरे, पो. शि. ९०१३ ए.व्ही. भुरुक यांचेसह उत्तमनगर पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग फिरत असताना त्यांना इस्कॉन मंदिर उत्तमनगर या ठिकाणी एक अल्पवयीन मुलगा निळ्या रंगाची एक्टीव्हा गाडी घेवुन फिरत असताना दिसला त्यास हटकले असता तो पळुन जावु लागला त्यास पाठलाग करुन थोड्याच अंतरावर १४/३० वाजताच्या सुमारास पकडुन,सदर अल्पवयीन मुलगा,वय-१३,रा.गोसावी वस्ती,उत्तमनगर,ता.हवेली,जि. पुणे यास त्याचे ताब्यात असलेले ॲक्टीव्हा गाडी क्रं.एमएच/१२/ईएस/६८५८ हिचेबाबत त्याचेकडे चौकशी करता तो उडवा-उडवीची उत्तरे देवु लागला म्हणुन,सदर गाडीबाबत खात्री करता,सदर गाडी चोरीस गेलेबाबत उत्तमनगर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.६४/२०१९ भा.दं.वि.क.३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे समजुन आले.